विनंती अर्ज समिती

विनंती अर्ज समिती (नियम-२७१)

विधानसभा विनंती अर्ज समिती ही विधानमंडळाची एक महत्वाची समिती आहे. या समितीची रचना सर्वप्रथम १५ मार्च, १९५७ रोजी झाली आहे. प्रत्येक वर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर किंवा यथास्थिती नवीन रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य असेल तितक्या लवकर विनंती अर्ज समितीची रचना करण्यांत येईल. विनंती अर्ज समितीवर मा.उपाध्यक्ष हे नियमानुसार समितीचे पदसिध्द समिती प्रमुख राहतील व इतर दहा सदस्यांची नियुक्ती नामनिर्देशनाद्वारे मा. अध्यक्ष करतील. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

समितीची कर्तव्ये (नियम-२७२(३) :

मा.अध्यक्षांनी नियम २७२ (१) अन्वये समितीकडे विचारार्थ पाठविलेल्या विनंती अर्जात समाविष्ट तक्रारी/सूचनासंबंधी सभागृहास अहवाल सादर करतेवेळी परिक्षणाधीन बाबीस लागू होतील असे निश्चित स्वरुपातील उपाय सुचविणे किंवा यापुढे अशा बाबींना कसा प्रतिबंध घालता येईल. त्याबाबत उपाययोजना सुचविणे हे विनंती अर्ज समितीचे प्रमुख कर्तव्य आहे.

समितीच्या कामकाजाचे स्वरुप (२६६ ते २७२)

"एखाद्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीसंबंधी काही तक्रारी असल्यास अथवा त्याबाबत विधायक स्वरुपाच्या काही सूचना असल्यास त्यासंबंधी विनंती-अर्ज विधानमंडळाला सादर करण्याचा उपजत हक्क जनतेला आहे" या तत्वानुसार जनतेने सभागृहाला विनंती अर्ज सादर करण्यासंबंधी व त्या अर्जावर सभागृहाने विचार करण्यासंबंधी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीच्या नियमांचा समावेश विधानसभा नियमांत करण्यात आला आहे.

साधारणतः पुढील बाबीसंबंधी विनंती अर्ज मा. अध्यक्षांच्या संमतीने सभागृहाच्या सदस्यांमार्फत सभागृहाला सादर करता येतो :-

(१) राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली अथवा सभागृहात पुरःस्थापित करण्यात आलेली विधेयके.

(२) सभागृहासमोर अनिर्णित असलेले कामकाज.

(३) न्यायालयाच्या कक्षेत न येणाऱ्या बाबी.

(४) ठराव, विधेयके इत्यादी प्रकारे कोणत्याही स्वरुपात सभागृहात येऊ न शकणाऱ्या बाबी.

(५) कायदा, नियम याद्वारे कोणत्याही स्वरुपाची उपाययोजना उपलब्ध नसलेल्या बाबी.

विनंती-अर्जात उपस्थित केलेला विषय राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्रातील असेल तरच विनंती अर्ज समिती त्यासंबंधी शासनाला शिफारस करु शकते. मात्र सामान्यतः ज्या बाबी सभागृहात अन्य मार्गाने उपस्थित करता येतात त्यासंबंधीचा विनंती अर्ज विधानसभेस सादर करण्यांस संमती दिली जात नाही.

विनंती अर्जातील विषय हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कसा महत्वाचा आहे. त्या विषयाला लोक किती महत्व देतात आणि त्या विषयाकडे अथवा तक्रारीकडे शासनाने त्वरित लक्ष देणे कसे आवश्यक आहे. या बाबींचा उल्लेख अर्जदाराने आपल्या विनंती अर्जात करणे आवश्यक असते. विनंती अर्ज विधानसभेस उद्देशून असणे आणि त्यात तक्रारीचा साक्षेपाने उल्लेख असणे आवश्यक आहे. विनंती अर्जावर अर्जदाराचे नांव, पत्ता व सही असली पाहिजे.

विनंती अर्जात अन्य सदस्यांच्या खाजगी जीवनाचा उल्लेख असता कामा नये. तसेच ज्या विधेयकांवर वा ठरावावर पूर्वी वर्षभरात चर्चा झाली असेल असा विषय विनंती अर्जात असू नये. विनंती अर्जात निश्चित स्वरुपाच्या तक्रारी किंवा सूचना नसेल, किंवा राजकीय हेतू प्रतिबिंबीत होत असेल किंवा व्यक्तिगत तक्रारीसंबंधी उल्लेख असेल तर विनंती अर्ज अस्वीकार्य ठरतो. केव्हा केव्हा विनंती अर्जातील बाबीसंबंधात वस्तुस्थिती शासनाकडून जाणून घेणे आवश्यक असल्यास तसे केल्यानंतर विनंती अर्जाची स्वीकार्हता ठरविण्यांत येते.

विधानसभेला सादर करावयाचा विनंती अर्ज सभागृहाच्या एखाद्या सदस्यानेच सादर केला पाहिजे मात्र तो सादर करण्यापूर्वी त्याकरिता प्रथम मा. अध्यक्षांची संमती घेणे आवश्यक आहे. विनंती-अर्ज सादर करणारा सदस्य अर्जातील तपशिलाबाबत व त्याच्या सत्यतेबाबत जबाबदार असतो (नियम-२६८) विनंती अर्ज विधानसभेत सादर

झाल्यानंतर तो मा.अध्यक्षांकडून विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ निर्देशित करण्यांत येतो. विनंती अर्जात नमूद केलेल्या तक्रारी किंवा अडचणी याबाबतची माहिती संबंधित विभागाकडून ३० दिवसांत मागवून ती माहिती समिती विचारात घेत असते व तिचे परिशीलन करताना समिती संबंधीत अधिकारी, विनंती अर्ज सादर करणारे सदस्य व विनंती अर्जावर सह्या करणाऱ्या व्यक्ती यांची आवश्यकतेनुसार समिती साक्ष घेत असते. समिती विनंती अर्जात उल्लेखिलेल्या स्थळांनाही आवश्यक वाटल्यास, प्रत्यक्ष भेट देऊनही पाहणी करु शकते. विभागाने पाठविलेली माहिती साक्षीदारांनी साक्षीच्या वेळी पुरविलेली माहिती व प्रत्यक्ष पाहणी करुन मिळालेली माहिती याच्या आधारे समिती संबंधीत विभागाच्या सचिवांची साक्ष घेते व प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समिती आपला अहवाल सभागृहास सादर करीत असते.

विधानसभा विनंतीअर्ज समितीने सभागृहास सादर केलेल्या काही अहवालातील महत्वाच्या शिफारशींची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

विधानसभा विनंती अर्ज समिती

(समितीच्या अहवालातील महत्वाच्या शिफारशी)

अ. क्र	विनंती अर्जाचा विषय	विधानसभेत अहवाल सादर झाल्याचा दिनांक	समितीने केलेल्या शिफारशी
१)	"डोंगरी (बु.) आणि चिखला, जिल्हा भंडारा येथील मँगनीज खाणीमुळे नजीकच्या गावात उद्भवलेल्या पर्यावरणासह विविध समस्यांवर उपाययोजना करणे"	१५ जुलै,२००५	कंपनीने पर्यावरणाच्या बाबतीत भरीव तरतूद करून बाधित परिसरात जास्तीत जास्त झाडे जगविली पाहिजेत. आवश्यकता असल्यास पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कंपनी अंतर्गत यासाठी एक विभाग निर्माण करण्यात यावा. रेन वॉटर हॉर्वेस्टिंगचा सर्वे रिपोर्ट तयार करावा. कंपनीने सांडपाण्याचा उपयोग करून जास्तीत जास्त झाडे जगवावीत. कंपनी परिसरातील डम्प परिक्षेत्रात तसेच डोंगरी (बु) गावाला जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला व इतर ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होईल त्या त्या ठिकाणी जास्तीत जास्त झाडे लावावीत अशी समितीने शिफारस केली आहे.
२)	"रांजणखार-डावली (ता.अलिबाग,जि.रायगड) येथे सागरी धूप प्रतिबंधक बंधारा बांधणे"	२० जुलै, २००५	नजिकच्या भविष्यात रांजणखार डावली हा गाव समुद्राच्या एखाद्या मोठया लाटेमुळे पुर्णतः उध्वस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गावे बुडाल्यानंतर जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्या गावांचे पुनर्वसनही करावे लागणार आहे. अशा वेळी नुकसान भरपाई देण्यासाठी व गावाचे पुनर्वसन करण्यासाठी शासनास कोट्यावधी रूपयांचा खर्च करावा लागेल. सद्यःस्थितीत बंधारा बांधल्यास तो खर्च टाळला जाऊ शकतो. यासाठी रांजणखार डावली येथे राज्यस्तरीय योजनेतून कायम स्वरूपी दगडी धूप बंधारा बांधणे नितांत आवश्यक आहे. साक्षीच्या वेळी नियोजन विभागाच्या सचिवांनी हे काम राज्यस्तरीय योजनेत समाविष्ट करण्यास नियोजन विभागाचा विरोध राहणार नाही, असे आश्वासित केले. त्यानुसार समितीने हे काम राज्यस्तरीय योजनेमध्ये घेण्याबाबत सुधारित प्रस्ताव सादर करावा तसेच याप्रकरणी मंत्रीमंडळाचा काय निर्णय झाला याची त्वरेने माहिती समितीला पाठवावी अशी समितीने शिफारस केली आहे.
३)	"हिंगणघाट तालुक्यातील (जि.वर्धा) अंजनसरा बॅरेज प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करणे"	१४ डिसेंबर, २००६	अंजनसरा बॅरेज योजनेमुळे २४ हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे वर्धा जिल्ह्याचा सिंचनाचा भौतिक अनुशेष काही अंशी कमी होईल. या बाबी लक्षात घेता सचिव, जलसंपदा व सचिव, वित्त (व्यय) यांनी समन्वयाने पाठपुरावा करून या प्रकल्पासाठी आगामी सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात भरीव आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली आहे.
४)	"उपरवाही, जि. चंद्रपूर येथील अंबुजा सिमेंट कंपनीमध्ये स्थानिक	१८ जुलै, २००७	ज्या प्रकल्पग्रस्तांकडे नामनिर्देशन नाही, जे गाव सोडून गेलेले आहेत व ज्यांना नोकरीची आवश्यकता आहे अशा किती प्रकल्पग्रस्तांनी विशेष भूअर्जन अधिकाऱ्यांकडे आवेदन केले, या

	बेरोजगारांना व प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोक-या देणे" या विषयाबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा विनंती अर्ज.		आवेदनांवर विशेष भूअर्जन अधिकारी, चंद्रपूर तसेच अंबूजा (मराठा) सिमेंट कंपनीने कोणता निर्णय घेतला याची माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात यावी तसेच अद्यापि निर्णय घेतलेला नसल्यास त्वरित निर्णय घेवून कार्यवाही करण्यात यावी. प्रकल्पग्रस्त प्रत्येक गावात १० वीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या ५ विद्यार्थ्यांस गुणानुक्रमे शिष्यवृत्ती देण्याचे कंपनीने मान्य केले असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. सन २००४ ते २००७ या कालावधीमध्ये कंपनीतर्फे देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची विगतवारी समितीला देण्यात यावी तसेच वेळोवेळी शिष्यवृत्तीच्या रक्कमेमध्ये कालानुरूप वाढ करण्यात यावी. विशेषत: अशा शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांमध्ये मुली असल्यास त्यांना जादा शिष्यवृत्ती देण्यात यावी जेणेकरून गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थी / विद्यार्थीनींना या शिष्यवृत्तीमुळे शिक्षणात मदत होईल अशी समितीने शिफारस केली आहे.
५)	"जायकवाडी प्रकल्प टप्पा क्रमांक २ माजलगांव, जिल्हा बिड या धरणाखाली पुनर्वसित झालेल्या गावांना नागरी सुविधा पुरविण्याबाबत" या विषयाबाबत श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. यांचा विनंती अर्ज.	२७ नोव्हेंबर, २००७	१)सन १९९९ च्या पुनर्वसन कायद्यातील तरतुदीनुसार सदरच्या पुनर्वसित गावातील लोकांना अठरा प्रकारच्या नागरी सुविधा पुरविण्याचा निर्णय घेऊन त्यानुसार करावयाच्या कामांसाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा व त्यानुसार सर्व कामे पूर्ण करण्यात यावीत. २) नदीच्या प्रवाहाच्या पातळीजवळ गावांचे पुनर्वसन करण्यांत आलेले आहे. एखादेवेळी पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास फार मोठी हानी होण्याचा धोका निर्माण होऊन गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होईल त्यामुळे या गावांच्या पुनर्वसनासाठी जमीन उपलब्ध नसल्यास त्यासाठी अन्य ठिकाणची जमीन उपलब्ध करण्यात यावी व या गावांचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्यात यावे, अशी समितीने शिफारस केली आहे.
६)	"निरा उजव्या कालव्याच्या सांगोला (जिल्हा सोलापूर) शाखा क्रमांक ३ व ४ वरील शेतीला कालव्याचे पाणी मिळणे" या विषयाबाबत श्री.गणपतराव देशमुख यांचा विनंती अर्ज	१५ जून, २००९	सांगोला शाखा कालवा प्रकल्पास केंद्र शासनाच्या नियोजन विभागाची डिसेंबर, २००७ मध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यातील अटीनुसार सदर प्रकल्प मार्च, २०११ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. हे पहाता सदर प्रकल्प पूर्ण करण्यास अद्याप दोन वर्षाचा कालावधी उपलब्ध आहे. सदर योजनेच्या अटीनुसार केंद्र शासनाने वितरीत केलेली ८०% इतक्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर केल्यानंतर अवितरित १० % केंद्रीय अनुदान वितरीत करण्यात येते. हे पहाता केंद्रीय सहाय्य वेळेवर मिळण्याच्या दृष्टिने व राज्य हिश्याची रक्कम उपलब्ध करण्याच्या दृष्टिने नियोजन करण्याची आवश्यकता आहे. **हा प्रकल्प नियोजनाप्रमाणे २०१०-२०११ मध्ये पूर्ण करण्याचे ठरले आहे. त्याप्रमाणे ए.आय.बी.पी. खाली केंद्र शासनाकडून आलेला निधी व राज्य शासनाचा १० टक्के हिस्सा मिळाल्यापासुन एक महिन्यात महामडळाकडे पाठविण्यात यावा. सदर प्रकल्प दुष्काळी तालुक्यातील असल्याने त्याला प्राधान्य देण्याचीही आवश्यकता आहे. तरी त्यादृष्टिने विहीत मर्यादेच्या कालावधीत ही योजना पूर्ण होण्याच्या दृष्टिने निश्चित नियोजन करण्याची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**